पुणे । मुंबई । कोल्हापूर । नाशिक । छत्रपती संभाजीनगर । सोलापूर । नागपूर । सातारा । जळगाव । नांदेड । अकोला । सांगली । अहमदनगर येथून प्रसिद्ध

SakalNews @SakalMediaNews www.esakal.com 9225 800 800

सकाळ

३५० वा शिवराज्याभिषेक दिन विशेष

पुणे, मंगळवार, ६ जून २०२३

# दुर्गाधिपती श्रीशिवछत्रपती

**केवळ मनुस्मृतीच नाही, तर वेद-पुराणांपासून ते रामायण, महाभारत अशा अनेक ग्रंथांमध्ये किल्ल्यांबाबतचे उल्लेख आढळतात. भारतात राज्य करणाऱ्या अनेक राज्यकर्त्यांनी त्या त्या भौगोलिक स्थितीचा, राज्यावर येणाऱ्या संकटांचा, जवळ असलेल्या साधनसंपत्तीचा विचार करून किल्ल्यांची उभारणी केलेली आहे. काही ठिकाणी त्याचा लढाईसाठी, संरक्षणासाठी, देखरेखीसाठी... तर काही ठिकाणी त्याचा राहण्यासाठी वापर केला गेला. यातील बहुतांश किल्ल्यांना फार मोठी ऐतिहासिक परंपरा लाभलेली आहे. या किल्ल्यांभोवतीच भारताचा इतिहास घडलेला आहे.**

**अनिकेत यादव**



भारतभूमीमधील राकट देशा, कणखर देशा अशी ओळख असणाऱ्या महाराष्ट्रास 'दुर्गांच्या देशा' असेही आवर्जून म्हटले जाते. ते येथे असणाऱ्या किल्ल्यांच्या विविधतेमुळेच. सिंधुसागरामधील जलदुर्गांपासून, सह्यपर्वतरांगांमधील गिरीदुर्गांपर्यंत आणि त्यापलीकडे असणाऱ्या विस्तीर्ण पठारावरील स्थलदुर्गांपर्यंत येथे दुर्गांची रांगच पहावयास मिळते. महाराष्ट्रातील तमाम मराठीजनांस देखील या गडकिल्ल्यांचा अपार अभिमान वाटतो. दुर्ग आणि शिवराय यांचे एकमेकांचे नातेच एवढे विलक्षण आहे की, त्यामुळे सर्व जनमानसांमध्ये एक समजूत घट्ट झालेली दिसून येते, ती म्हणजे, महाराष्ट्रातील या गिरीशिखरांवर जितके काही किल्ले आहेत ते आपल्या शिवाजी महाराजांनीच उभारले असले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या उण्यापुऱ्या १८३०६ दिवसांच्या आयुष्यामध्ये अनेक लोकविलक्षण कामे केली आहेत. केवळ महाराष्ट्रातच नाहीतर अगदी तमिळनाडूपर्यंत त्यांनी दुर्गांची उभारणी केली आहे. डोंगरांबरोबरच समुद्रातील बेटांवर देखील किल्ल्यांची बांधणी केली आहे. या दोन्ही ठिकाणी दुर्गबांधणी करणे कमालीचे अवघड काम असते. काही किल्ल्यांची पुनर्बांधणी केली आहे, तर काही किल्ले पाडूनही टाकलेले आहेत. काही जोडकिल्ले एकत्र करून मिश्रदुर्गांची देखील निर्मिती केलेली आहे. मुघलांच्या आक्रमणास तोंड देण्यासाठी साल्हेरपासून ते जिंजीपर्यंत २६० हून अधिक किल्ल्यांची रांगच त्यांनी उभी केली. केवळ किल्ल्यांची उभारणी करून ते थांबले नाहीत तर त्याच्या योग्य व्यवस्थापनास त्यांनी जास्त महत्त्व दिले.

एका गडावरच त्यांचा जन्म झाला आणि पुढे जन्मभर गडकोट जिंकण्याचा ध्यास त्यांनी घेतला. आपल्या राज्याची राजधानी देखील एका उंच गडावर उभी करणारा, स्वतःचा राज्याभिषेक देखील गडावरच करणारा, गडकिल्ल्यांवर निरतिशय प्रेम करणारा आणि आपला अंतिम श्वास देखील एका गडावरच घेणारा असा हा युगप्रवर्तक शककर्ता राजा इतिहासात दुसरा कुणी झाला नाही. म्हणून तर समर्थांनी त्यांना 'गडपति' म्हणून गौरविले आहे.

शत्रूंशी रणांगणावर प्रत्यक्ष लढा तर दिलाच, पण शत्रूबरोबर आपल्या नित्यव्यवहारात घुसलेल्या शब्दांना प्रतिशब्द देऊन भाषाशुद्धीसारखे महान कार्य केले. राजव्यवहार कोशातील सातवे प्रकरण हे दुर्गासंबंधीचे आहे. यामध्ये दुर्गांशी संबंधित अनेक परकीय शब्दांना स्वकीय शब्द दिलेले आहेत. आज्ञापत्रातील आठव्या प्रकरणात दुर्गांचे महत्त्व, व्यवस्था, रचना इत्यादी बाबींची सविस्तर माहिती दिलेली आहे.

कवीराज भूषण आपल्या एका काव्यात म्हणतात,

*देखत उचाय उदरति पाग सूधी राह द्यौ सहू में चढे ते*
*जे साहसनिकेत हैं ।*
*सरजा हुकम तेरौ पाय पैदलनि सलहेर परनाले से ते*
*जीते जिनु खेत हैं ।*
*सावन भादौं की भारी कुहूकी अंध्यारी चढि दुर्ग पर*
*जात मावला बल सचेत हैं ।*
*भूषन भनत शिवराज छत्रधारी तहां तेरे परताप की*
*उज्यारी गढ लेत है ।*

"ज्या गडांची उंची पाहताना डोक्यावरील पगडी (मान वर करून पाहिल्याने) खाली पडते आणि त्यावर(गडावर) दिवसा देखील सरळ चढता येत नाही, त्यावरती केवळ अत्याधिक साहसी व्यक्तीच चढू शकतात. महाराज, तुम्ही आदेश देताच शूर मावळ्यांची सेना श्रावण आणि भाद्रपद महिन्यांतील अमावस्येच्या घनघोर रात्री पायी चढून जाते, त्या पन्हाळा आणि साल्हेर गडांना मावळे सपाट शेताप्रमाणे जिंकून घेतात. भूषण म्हणतात, अशा प्रकारे घनघोर अंधाऱ्या रात्री या गडांवरती चढून जाण्याचा विचार केला तेव्हा मला माहीत झाले की, फक्त तुमच्या प्रतापरूपी सूर्याच्या उजेडातच हे गड जिंकले जाऊ शकतात."

या गडकोटांबद्दल शिवछत्रपतींचा किती आत्मविश्वास होता हे सांगणारे भाष्यच शिवदिग्विजयकाराने दिले आहे. ते लिहितात, पंतांनी एकदा छत्रपती शिवाजी महाराजांना आपण किल्ल्यांवर एवढा का खर्च करीत आहोत असा प्रश्न विचारला. त्यावर महाराज म्हणाले, "दिल्लींद्रासारखा शत्रू उरावर आहे. तो आला तरी नवेजुने तीनशे साठ किल्ले हजेरीस आहेत. एक एक किल्ला वर्ष वर्ष लढला तरी पुरी दख्खन काबीज करावयास आलमगिरास तीनशे साठ वर्षे पाहिजेत." त्यांचे हे म्हणणे जणू औरंगजेबाने खरेच करून दाखविले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर चुटकीसरशी मराठ्यांचे राज्य जिंकू या वल्गनेने दख्खनेत महाकाय फौजा घेऊन उतरलेला औरंगजेब ३६० वर्षे काही जगू शकला नाही. आदिलशाही, कुतुबशाही जिंकली, मात्र मराठ्यांचे राज्य अखेरच्या श्वासापर्यंत त्याला जिंकता आले नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी दीर्घकालीन नियोजन करून दूरदृष्टीने उभारलेल्या गडकोटांनीच मुघलांची त्रेधातिरपिट उडवली. यावर रामचंद्रपंतांनी म्हटले आहे की, 'राज्यात किल्ले होते म्हणोन अवशिष्ट तरी राज्य राहिले.'

## गडकोटांची सद्यःस्थिती

आता गडकोटांवर येणाऱ्या पर्यटकांचे प्रमाण एवढे वाढले आहे की, त्यातून कळत-नकळत गडांचे नुकसान होऊ लागले आहे. अखंड तोफांच्या माऱ्याने जेवढे नुकसान या गडकिल्ल्यांच्या तटांचे झाले नाही तेवढे नुकसान विध्वंसक मनोवृत्तीच्या पर्यटकांकडून झालेले आहे. याचे वेळीच नियोजन केले नाही तर यापुढे शंभर-सव्वाशे वर्षांत गडकोटांवरील वास्तू या आपल्याला ग्रंथांमध्ये आणि फोटोंमध्येच पहावे लागतील. एके काळी शक्ती-सामर्थ्याचे व कला-कौशल्याचे केंद्र असणारे हे गडकोट केवळ मौजमजेचे केंद्र व्हायला नको, ही जबाबदारी केवळ प्रशासनाचीच नव्हे तर आपणां सर्वांचीच. शेकडो वर्षे परकीय शत्रूंपासून या गडकिल्ल्यांनीच आपले संरक्षण केले आहे, आता या गडकिल्ल्यांचे संरक्षण-संवर्धन आणि जतन करण्याची जबाबदारी आपली आहे. एक संस्कृती विकसित होण्यासाठी फार मोठा काळ जावा लागतो, मात्र तीच संस्कृती उद्ध्वस्त होण्यासाठी शत्रूची एक स्वारी पुरेशी पडते. आता या ऐतिहासिक स्मारकांवर कोणत्याही परकीय शत्रूचे आक्रमण होणार नसले तरी आपणच जर त्याचे संरक्षण व देखभाल करण्यास कमी पडलो, तर मात्र या वास्तू नष्ट होण्यास वेळ लागणार नाही. जेवढा पराकोटीचा अभिमान आपल्याला आपल्या गौरवशाली इतिहासाबद्दल असतो तेवढाच अभिमान या ऐतिहासिक स्थानांबद्दल असला पाहिजे. आपली वारसास्थळे नाहीशी झाली तर पर्यटन आणि देशाच्या सांस्कृतिक भविष्याचे काय होईल? संस्कृती आणि वारसा यावरच देशाची अस्मिता अवलंबून असते आणि त्याकडे दुर्लक्ष झाल्यास राष्ट्र अस्तित्वहीन होते, हे सत्य आपण कदापि विसरू नये.

जिंजी किल्ला